# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक :18.03.2024** **वार-सोमवार**

---------------------------------------------------------------------------------------------------

1.निवडणूक रोख्यांबाबत सर्वोच्च न्यायालयाकडून डिजीटल स्वरूपात मिळालेली माहिती निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर प्रकाशित

2.आदर्श आचार संहितेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी निवडणूक आयोगाकडून मार्गदर्शक तत्त्व जारी

3.पुणे ईसिस मॉड्यूल प्रकरणी एनआयएद्वारे पुण्यात चार मालमत्ता जप्त

4.महिला प्रिमियर लीग क्रिकेटमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने जेतेपद पटकावलं.

**निवडणूक रोखे**

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार रजिस्ट्रीकडून निवडणूक रोखे संदर्भात मिळालेल्या सीलबंद लिफाफ्यातील नवी माहिती काल केंद्रीय निवडणूक आयोगाने त्यांच्या संकेत स्थळावर जाहीर केली. विविध पक्षाला निवडणूक रोख्यातून मिळालेलं उत्पन्न यामध्ये प्रकाशित करण्यात आलं आहे. निवडणूक रोख्यांसंदर्भात विविध पक्षांनी भरून दिलेली माहिती निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयाला बंद लिफाफ्यात आणि डिजिटल स्वरुपात दिली होती. त्याबद्दलची शहानिशा करून सर्वोच्च न्यायालयाने १५ मार्चला निवडणूक आयोगाला ही माहिती प्रकाशित करण्याचे निर्देश दिले होते, त्यानुसार आयोगाने काल आपल्या संकेतस्थळावर ही माहिती प्रकाशित केली आहे.

**आचार संहिता**

लोकसभा निवडणुकीच्या घोषणेनंतर निवडणूक आयोगानं आदर्श आचार संहितेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक तत्त्व जारी केली आहेत. यासंदर्भात निवडणूक आयोगानं कॅबिनेट सचिव, सर्व राज्यांचे मुख्य सचिव आणि मुख्य निवडणूक अधिकारी यांना पत्र पाठवलं आहे. सार्वजनिक ठिकाणांवर राजकीय जाहिराती असलेले सर्व फलक हटवण्याचे निर्देश आयोगानं दिले आहेत. या काळात राजकीय पक्ष किंवा उमेदवाराला निवडणूक प्रचारात सरकारी वाहन वापरता येणार नाही, सरकारी लाभ सांगणाऱ्या जाहिराती प्रसारित करता येणार नाहीत. या मार्गदर्शक तत्वांनुसार मतदार जागरूकतेसाठी नभोवाणी, दूरचित्रवाणी, चित्रपट आणि सरकारी वाहिन्यांच्या माध्यमातून कार्यक्रमांचं प्रसारण करता येणार आहे.

**झेंडे बॅनर्स**

निवडणूक आयोगाच्या सुचनेनंतर नाशिक महापालिकेनं शहरातील विविध भागांमध्ये लावलेले पोस्टर्स, बॅनर्स आणि राजकीय पक्षांचे झेंडे काढले. सुमारे दीड हजार झेंडे, बॅनर्स आणि फलक हटवण्यात आल्याची माहिती महापालिकेच्या अतिक्रमण विभागाचे उपायुक्त नितीन नेर यांनी दिली.

**जिल्हाधिकारी–सोमणी,विविध पीटीसी**

लोकसभा निवडणूक प्रक्रियेसाठी राज्यातील सर्व जिल्ह्यातील प्रशासन सज्ज झालं असून, काल विविध जिल्हाधिकार्यांनी पत्रकार परिषद घेऊन, मतदारांची संख्या, मतमोजणीची व्यवस्था आणि मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी करण्यात येत असलेल्या विविध उपाययोजनांची माहिती दिली. पुणे, सांगली, सोलापूर, रायगड, अमरावती, चंद्रपूर, बीडसह विविध जिल्ह्यांच्या जिल्हाधिकार्यांनी काल पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

पुणे जिल्ह्यात पुण्यासह मावळ, शिरुर आणि बारामती या ४ लोकसभा मतदारसंघांचा समावेश असून एकंदर 82 लाख 24 हजार 423 पात्र मतदार असल्याचं जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी पुण्यात पत्रकार परिषदेत सांगितलं.

या सर्व मतदारसंघात निवडणुकीची अधिसूचना, उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या तारखा, अर्जाची छाननी याबाबत अधिक माहिती देताना सुहास दिवसे म्हणाले --

**कारवाई**

लोकसभा निवडणूक काळात समाज माध्यमातून वादग्रस्त माहिती प्रसारित करणाऱ्यांवर पोलिसांची करडी नजर राहणार आहे. यासाठी लातूर पोलिस सोशल मीडिया मॉनिटरिंग सेल तसंच सायबर पोलिसांच्या माध्यमातून नजर ठेवणार आहेत. द्वेषभावनेने प्रेरित असलेली भाषणं, चुकीची माहिती, खोट्या बातम्या, मतदाराला आमिष दाखवणे, आदी बाबी आचारसंहिता भंग करणाऱ्या आहेत. त्यामुळे असे संदेश प्रसारित करणाऱ्या व्यक्तीवर तसेच व्हाट्सएप ग्रुपवरील सदस्यांसह ग्रुप एडमिनवर भारतीय दंड विधानाच्या विविध कलमानव्ये गुन्हा दाखल होऊ शकतो अशी स्पष्ट ताकीद लातूरचे जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे आणि जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी दिली आहे.

**प्रचार**

लोकसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्यानंतर विविध पक्षांच्या नेत्यांनी प्रचाराला प्रारंभ केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आंध्र प्रदेशातील पालनाडू जिल्ह्यात जाहीर सभेला संबोधित केलं. राष्ट्रीय लोकशाही आघाडी, प्रादेशिक आकांक्षा आणि राष्ट्रीय प्रगती या दोन्ही गोष्टी लक्षात घेऊन पुढे जात असल्याचं मोदी म्हणाले.

दुसरीकडे विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीची सभा काल मुंबईत शिवाजी पार्कवर झाली. इंडिया आघाडीचे दिग्गज नेते या सभेला उपस्थित होते. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे, राहुल गांधी, शरद पवार, उद्धव ठाकरे, फारुख अब्दुल्ला, प्रकाश आंबेडकर, तेजस्वी यादव, स्टॅलिन, तसंच प्रियंका गांधी यांच्यासह, घटक पक्षांचे राज्यातीलही महत्त्वाचे नेते, सभेला उपस्थित होते. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या भारत-जोडो न्याय यात्रेची सांगता या सभेनं झाली. यावेळी बोलताना राहुल गांधी यांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या धोरणांवर जोरदार टीका केली. सभेपूर्वी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन केलं. तसंच शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीस्थळालाही भेट दिली.

केंद्रीय राज्यमंत्री आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे अध्यक्ष रामदास आठवले यांनी काल नागपूरमध्ये पत्रकार परिषद घेतली. महायुतीमध्ये घटक पक्ष म्हणून शिर्डी आणि सोलापूर या लोकसभा मतदार संघाच्या जागेची मागणी रिपब्लिकन पार्टीने केली आहे; यासंदर्भात आवश्यक ते सहकार्य करण्याचं आश्वासन भाजपा अध्यक्ष जे पी नड्डा यांनी दिलं आहे असं आठवले यांनी सांगितलं.

**पक्षप्रवेश**

नंदुरबारमधील उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे विधानपरिषद आमदार आमश्या पाडवी यांनी काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेमध्ये प्रवेश केला. आमश्या पाडवी यांनी नंदुरबार जिल्ह्यात आदिवासी समाजासाठी कायम संघर्ष केला, या समाजाला न्याय देण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. त्यांच्या शिवसेना प्रवेशामुळे या भागातील नागरिकांना दिलासा देणे शक्य होणार आहे अस शिंदे यांनी यावेळी सांगितलं. यावेळी असंख्य कार्यकर्त्यांनाही शिवसेनेमध्ये प्रवेश केला.

**<u>एनआयए</u>**

पुणे ईसीस मोडयूल प्रकरणी 11 आरोपींशी निगडीत चार स्थावर मालमत्ता राष्ट्रीय तपास संस्थेनं काल जप्त केल्या. या मालमत्तांचा वापर दहशतवादी कृत्याचं प्रशिक्षण, तसंच स्फोटकं तयार करण्यासाठी केला जात असल्याचं एनआयएनं म्हटल आहे. जप्त केलेल्या मालमत्ता पुण्यातील कोंढवा परिसरात असून या प्रकरणी एनआयएनं 11 जणांवर या आधीच आरोपपत्र दाखल केलं आहे.

**<u>निवृत्त</u>**

आकाशवाणी पुणे केंद्रातील वरिष्ठ लिपिक मेधा कुलकर्णी या ३३ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर काल सेवानिवृत्त झाल्या. त्यांनी १९९१पासून आकाशवाणी नाशिक आणि पुणे केंद्रात प्रशासन, लेखा विभाग, कार्यक्रम निर्मिती, ग्रंथालय, भांडारगृह, अशा विविध विभागात काम केलं.

**<u>हॉकी इंडिया</u>**

१४वी हॉकी इंडिया वरिष्ठ महिला राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत दिवस हरियाणा संघाने गाजवला. नेहरूनगर इथल्या मेजर ध्यानचंद मैदानावर झालेल्या सामन्यात हरियाणा संघाने गोलांचा पाऊस पाडत पाँडिचेरी संघाचा 22-0 असा धुवा उडवत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. अन्य दुसऱ्या सामन्यात असोसिएशन ऑफ हॉकी ओडीसा संघाने चंदिगड संघावर 6-1 अशी मात करत उपांत्यपूर्व फेरी गाठली. हॉकी मिझोराम आणि हॉकी राजस्थान या संघांनीही विजय मिळवले असले तरी अद्यापही त्यांना अंतिम आठ संघात स्थान मिळवता आलेलं नाही.

**<u>WPL</u>**

महिला प्रिमियर लीग क्रिकेटमध्ये काल झालेल्या अंतिम सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने दिल्ली कॅपिटल्स संघावर ८ गडी राखून विजय मिळवत, जेतेपद पटकावलं. नवी दिल्लीतल्या अरुण जेटली मैदानावर काल हा सामना पार पडला. दिल्ली कॅपिटल्स संघाचं ११४ धावांचे आव्हान रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने १९ षटक आणि ३ चेंडूत पूर्ण केलं.

एलीस पेरी हिने सर्वाधिक ३५ धावा केल्या. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतलेल्या दिल्ली कॅपिटल्स संघाने १८ षटक आणि ३ चेंडूत सर्व गडी बाद ११३ धावा केल्या. सोफी मोलीन्युक्स या सामन्यातील उत्कृष्ट खेळाडू ठरली.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार